## कृषि विभाग जिल्हा परिषद वाशिम

### प्रस्तावना

**वाशिम** जिल्हयाचे एकुण भौगोलीक क्षेत्र ५१३००० हेक्टर आहे जिल्हयाचे एकुण भौगोलीक क्षेत्रा पैकी जगलाचे क्षेत्र ३२०००० हेक्टर आहे जिल्हयाचे हवामान उष्ण व कोरडे असुन लागवडीसाठी खरीप हंगामातील पिंकाचे सर्वसाधारण क्षेत्र ४०९०६३ हेक्टर रब्बी हंगामातील पिकाचे सर्वसाधारण ८१७२४ हेक्टर आहे व उन्हाळी हंगामातील पिकाचे सर्वसाधारण क्षेत्र ४२० हेक्टर आहे.

**लागवडी योग्य जमीनीची वर्गवारी :-**

| **जमिनधारणेनुसार वर्गीकरण (२००१ कृषि गणणेनुसार)** | | |
|---|---|---|
| **क्षेत्र** | **भुधारक संख्या** | **टक्के** |
| १ हेक्टरचे आतील | ३४०३२ | २१.६९ |
| १ ते २ हेक्टर पर्यंत | ५८१४० | ३७.०५ |
| २ ते ५ हेक्टर पर्यंत | ४८२६४ | ३०.७६ |
| ५ ते १० हेक्टर पर्यंत | १३६७८ | ८.७१ |
| १० ते २० हेक्टर पर्यंत | २६४२ | १.६८ |
| ५० हेक्टर वरील | १३६ | ०.११ |

जिल्हयात सन २०१७-१८ मध्ये पर्जन्यमान एकुण ७४ टक्के पाऊस झालेला आहे.

**सन २०१७-१८ तालुकानिहाय पर्जन्यमान**

| **तालुका** | **सरासरी पाऊस** | **२०१७-१८ मध्ये प्रत्यक्ष पडलेला पाऊस** | **पावसाची टक्केवारी** |
|---|---|---|---|
| वाशिम | ९१२ | ५०८ | ५६ |
| मालेगाव | ८४० | ७७९ | ९३ |
| रिसोड | ७५१ | ८९५ | ११९ |
| मंगरुळपिर | ७७९ | ४०० | ५१ |
| मानोरा | ७६० | ४५६ | ६० |
| कारंजा | ७५१ | ४९४ | ६६ |
| सरासरी | ७९९ | ५८९ | ७४ % |

## खरीप/रब्बी हंगाम-पिक पेरणी अहवाल

**खरीप हंगाम सर्वसाधारण क्षेत्र ४०९०६३ हेक्टर**

| अ.क्र | पिकाचे नांव | खरीप २०१७ मधील लागवडी खालील क्षेत्र हेक्टर |
|---|---|---|
| १ | सोयाबीन | २७३५१७ |
| २ | कापुस | ३०९२१ |
| ३ | तुर | ५७५१५ |
| ४ | ज्वारी | ५८०३ |
| ५ | उडीद | १९९११६ |
| ६ | मुग | १३४४५ |
| ७ | ईतर पिके | ११२१ |
| | एकुण | ४०२२३८ |

**रब्बी हंगाम सर्वसाधारण क्षेत्र ८१७२४ हेक्टर**

| अ.क्र | पिकाचे नांव | खरीप २०१७ मधील लागवडी खालील क्षेत्र हेक्टर |
|---|---|---|
| १ | गहु | ९९०३ |
| २ | हरभरा | ४९५८४ |
| ३ | ज्वारी | ३९२ |
| ४ | मका | १३७ |
| ५ | ईतर पिके | ११७ |
| | एकुण | ६०१३३ |

**उन्हाळी हंगाम सर्वसाधारण क्षेत्र –**

| अ.क्र | पिकाचे नांव | खरीप २०१७ मधील लागवडी खालील क्षेत्र हेक्टर |
|---|---|---|
| १ | मका | १५० |
| २ | भुईमुग | ९१२८ |
| ३ | तीळ | १५८ |
| ४ | सुर्यफुल | ० |
| ५ | ज्वारी | ४६ |
| ६ | भाजीपाला | ० |

| | | |
|---|---|---|
| ७ | मुग | ४०० |
| ८ | इतर | १४५ |
| | एकुण | १००२७ |

**जिल्हयात सन २०१७-१८ वर्षातील क्षेत्र व उत्पादकता खालील प्रमाणे आहे.**

| **अ.क्र** | **पीक** | **क्षेत्र हेक्टर** | **उत्पादकता कीलो/हेक्टर** |
|---|---|---|---|
| १ | कापुस | ३०९२१ | १७० |
| २ | सोयाबीन | २७३५१७ | ७९२ |
| ३ | तुर | ५७५१५ | ३०६ |
| ४ | मुग | १३४४५ | ४९४ |
| ५ | उडीद | १९९१६ | ५५४ |
| ६ | ज्वारी | ५८०३ | ----- |
| ७ | गहु | ९९०३ | ११२७ |
| ८ | हरबरा | ४९५८४ | ६४० |

## कृषि विभाग जिल्हा परिषद वाशिम अंतर्गत येणाऱ्या योजना

## जिल्हा परिषद सेसफंड योजना सन २०१६-१७

| अ.क्र | योजनेचे नांव | सन २०१६-१७ करीता मंजुर तरतुद रु. |
|---|---|---|
| १ | शेतीनिष्ठ शेतक-यास पुरस्कार ,कृषी दिन साजरा करणे,शेतक-याना माहिती शिक्षण व सुसंवाद साधने | ३००५७७/- |
| २ | शेतकऱ्यांची सहल आयोजीत करणे (प्रती शेतकरी रु.५००) | १०००/- |
| ३ | शेतकऱ्यांना ७५ टक्के अनुदानावर एचडीपीई/पीव्हीसी पाईपचा पुरवठा करणे | १०००/- |
| ४ | शेतकऱ्यांना ७५ टक्के अनुदानावर पेट्रोकेरोसीन,ऑईल इंजीन पॉवर स्प्रे पुरवठा करणे | २०,००,०००/- |
| ५ | शेतकऱ्यांना ७५ टक्के अनुदानावर सौर कंदील पुरवीने | १०००/- |
| ६ | शेतीनिष्ठ शेतकऱ्यांना पुस्कार | ०० |
| ७ | शेतकऱ्यांना ७५ टक्के अनुदानावर ताडपत्री पुरवीने | २६,१२,९२३/- |
| ८ | शेतकऱ्यांना ७५ टक्के अनुदानावर नाविन्य पुर्ण योजना तारकुपंन अर्जा कार्यक्रम पथदिवे सी.एफ.एल.व इतर मोबाईल स्टार्टर,बियाणे वाटप इत्यादी | ५०,०००/- |
| ९ | कृषि अभियात्रिकी योजने अंतर्गत शेतकऱ्यांना पुरक अर्थ सहाय्य | १०००/- |
| १० | शेतकरी चर्चा सत्र आयोजीत करणे तांत्रिक माहितीची शेती वर्ग आयोजीत करणे | ८०,२०४/- |
| ११ | शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी कृषि प्रदर्शनाची आयोजन/मेळावे घेणे | १०००/- |
| १२ | शेतकऱ्यांना ७५ टक्के अनुदानावर सामुहीक तारकुंपन पुरविणे | ७,५०,०००/- |
| १३ | केंद्र/राज्यस्तरीय मान्यता प्राप्त संस्थेमध्ये प्रशिक्षण खर्चाची प्रतीपुर्ती करणे | १०००/- |
| | **एकुण** | **५७,९९,७०४/-** |

**कार्यक्रमाचे नाव :- <u>राष्ट्रीय बायोगॅस व खत व्यवस्थापन कार्यक्रम सन २०१७-१८</u>**

निसर्गामध्ये मेलेल्या प्राण्याची व वनस्पती ची विल्हेवाट लावण्याची एक पध्दती असते. यापध्दती मध्ये मृत शरीरावर आणि वनस्पतीवर कुजण्याची प्रक्रिया होवुन त्यापासुन सेंद्रीय खत तयार होते व जमिनीच्या पृष्ठभागावर पसरुन मातीत मिसळते आणि ते कार्य घडत असतांना निर्माण होत असणारा वायु (गॅस) हवेमध्ये मिसळतो.ही कुजण्याची प्रक्रीया दोन प्रकारे चालते.

**अ.** हवा विरहीत अवस्थेमध्ये

**ब**. हवेच्या सानिध्यात ही प्रक्रिया घडवुन आणण्यासाठी बॅक्टेरिया हे सुक्ष्म जिवाणु मदत करतात.बायोगॅस हा ज्वलनशिल वायु सेंद्रीय पदार्थांच्या हवा विरहित विघटनापासुन तयार होतो. बायोगॅस हे मुख्यता मिथेन व कर्बाम्ल वायू या दोन वायुचे मिश्रण आहे.यात मिथेनचे प्रमाण ५५ ते ७०% व कर्बाम्लवायुचे प्रमाण ३० ते ४५% असते

**महत्व –** १ जैव इंधन उपलब्द करुन दंणे, विशेषता वाढत्या महागाईमध्ये LPG गॅसला पर्याय म्हणुन उपभोगता येते.

२) जैविक खत उपलब्द करुन देणे जेणे करुन रासायनिक खतांचा वापर कमी होउन पर्यावरणाचा समतोल राखुन कमी खर्चात शेती करता येईल.

३) Lifetime Energy : बायोगॅस संयंत्राचा उपयोग हा वर्षानुवर्ष घेता येतो.

४) बायोगॅस संयंत्राचा उपयोग घरगुती गॅस करीता केल्यास इंधनाकरीता होणा-या जुगलतोडीस आळा घालता येईल.

५) गावपातळीवर बायोगॅस संयंत्राचा शौचालयाची जोडणी केल्यास स्वच्छता राख्ण्यास मदत होते.

६) कार्बन आणि मिथेन हया पर्यापरणास व आरोग्यास घातक असलेल्या वायुंच्या उत्सर्जाना आळा घालुन पर्यावरणाचा समतोल राखता येईल.

७) नवीन तंत्रज्ञानाची साथ घेउन बायोगॅस संयंत्राच्या मदतीने इलेक्ट्राऍनीक यंत्रे जसे लाईट मोटार इ. चा वापर केला जाउ शकतो.

बायोगॅस विकास कार्यक्रम योजना **कृषी विभाग, जिल्हा परिषद वाशिम** यांचेकडुन खालील प्रमाणे राबविण्यात येते.

**१. लाभार्थ्याची पात्रताः-**

अ. लाभार्थ्ाी चे स्वतःचे नावे शेतजमीन असावी व नावे ७/१२. ८ अ असावे.

ब. भुमीहीन शेतकरी योजनेचे लाभास पात्र राहील परंतु त्याचे स्वतःचे मालकिची जागा असावी.

क. लाभार्थ्याकडे पुरेसे गूरेढोरे असावी

ड. मागास वर्गीय लाभार्थ्यास जातीचा दाखला सादर करावा लागेल.

**२. लाभ मिळण्यासाठीची :-**

इच्छुक लाभार्थ्यांनी वरील प्रमाणे कागदपत्रासह अर्ज पंचायत समिती स्तरावर सादर करुन अर्ज मंजुरी नंतर बायोगॅसचे बांधकाम केल्यानंतर बायोगॅस सुरू झाल्यानंतर अनुदान मिळण्यास पात्र राहील.

**३. पात्रता ठरविण्याची आवश्यक :-**

अ. लाभार्थ्याचा अर्ज असलेली कागदपत्रे

ब. ७/१२ गाव नमुना ८ अ

क. जातीचा दाखला

ड. गुरेढोरे असल्याबाबत दाखला

ई. रहिवासी दाखला

**४. मिळणाऱ्या लाभाची विस्तृत माहिती :-**

| **बाब** | **अनुदान मर्यादा** |
|---|---|
| अ. सर्वसाधारण शेंतकरी | २ ते ४ घ.मी.चे.बायोगॅस करीता रु.९०००/- अतिरिक्त अनुदान संयंत्रास संडास जोडल्यास रु.१२००/- |

ब. अनु.जाती/अनु.जमाती २ ते ४ घ.मी.चे बायोगॅस करीता रु.११०००/-

**५. अनुदान वाटपाची कार्यपध्दती :-**

इच्छुक लाभ धारकानी अर्ज पंचायत समितीस्तरावर सादर केल्यावर व अर्ज मंजुरी नंतर बायोगॅसचे बांधकाम केल्यानंतर बायोगॅस सुरु झाल्यानंतर अनुदान मिळण्यास पात्र राहील

**(नरेंद्र बारापात्रे)**
**कृषि विकास अधिकारी**
**जिल्हा परिषद वाशिम**